महाराष्ट्र शासन
# शासकीय कला व अभिकल्प महाविदयालय,
किले अर्क, छत्रपती संभाजीनगर
दुरध्वनी क्र-0240-2970225, वेबसाईट - www.gcadaurangabad.com, ईमेल आयडी-gsa.aurangabad@gmail.com

दिनांक :- १३/११/२०२४

संदर्भ :- मा.संचालक, कला संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे पत्र क्रमांक:डिओअे-२०२४/तीन/३०७०, दिनांक १९/०९/२०२४

२. सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, शासन निर्णय क्र.ज्येष्ठना २०१६/प्र.क्र.७१/सामासू,दि.९/७/२०१८

## सूचना

संस्थेतील सर्व वर्गशिक्षकांना सूचित करण्यात येते की, ज्येष्ठ नागरिकांचे समाजातील स्थान लक्षात घेता त्यांना वृध्दापकाळ चांगल्या तऱ्हेने घलविता यावा, समाजामध्ये त्यांचे जीवन सुसह्य व्हावे, शारिरीक/मानसिक आरोग्य सुस्थितीत रहावे, वृध्दापकाळामध्ये त्यांच्या आर्थिक क्षमता, कामाचा हक्क, शिक्षणाचा हक्क आणि सार्वजनिक मदत मिळविण्यासाठी राज्य शासनाने दिनांक १४/०६/२००४ रोजी राज्याचे ज्येष्ठ नागरिक धोरण, २००४ (भाग-१) जाहिर केले आहे.

संदर्भिय कला संचालनालयाचे पत्र व शासन निर्णयान्वये जेष्ठ नागरिक धोरणाची अंमलबजावणीच्या अनुषंगाने कार्यवाही करण्याचे निर्देश देण्यात आले असून आपल्या महाविद्यालयामध्ये खालीलप्रमाणे कार्यवाही करण्यात यावी.

अ) **महाविद्यालयाच्या स्तरावर ज्येष्ठ नागरिकांसाठी खालीलप्रमाणे विविध विषयांवरील कार्यशाळा आयोजित करण्यात याव्यात.**

१) मातकाम, वस्त्रकला, छायाचित्रण, स्क्रीन प्रिंटीग, पर्यावरण पूरक विविध कागदी वस्तू बनविणे या विविध माध्यमातून निरनिराळ्या जीवनोपयोगी, शोभेच्या वस्तु उत्पादित करण्याचे तंत्र शिकविणे.

२) शासन व खाजगी क्षेत्रात कार्यरत असलेल्या विविध संस्था व अशासकीय संघटनांशी संपर्क साधून ज्येष्ठ नागरिकांचे जीवन सर्वार्थाने सुसह्य होईल अशा उपाययोजना करणे.

आ) **ज्येष्ठ नागरिकांचा विविध संस्थांशी संपर्क व सहभाग वाढविणे.**

१) वस्त्रकला, मातकाम, छायाचित्रण, स्क्रीन प्रिंटीग, शोभेच्या वस्तू या विविध माध्यमातून निर्मित उत्पादने विक्री व्यवस्थापनासाठी संबंधीत विविध सांस्कृतिक केंद्रे, उद्योग केंद्रे यांचेशी ज्येष्ठ नागरिकांचा समन्वय घडवून आणणे.

२) ज्येष्ठ नागरिकांना आपली कला प्रदर्शित करता यावी, या करिता विविध कला दालनांशी ज्येष्ठ नागरिकांचा संपर्क वाढविणे.

३) ज्येष्ठ नागरिकांकडील विविध कलांचे ज्ञानाची व विचारांची देवाण घेवण होण्यासाठी ज्येष्ठ नागरिक व विद्यार्थी यांचेमध्ये कार्यशाळा, शिबीरे आयोजित करणे.

(प्रा.रमेश सुभाष वडजे,)
अधिष्ठाता,
शासकीय कला व अभिकल्प महाविद्यालय, छत्रपती संभाजीनगर